Telegram:"Dnyanteerth"

**Swami Ramanand Teerth**
**Marathwada University**

*"Dnyanteerth", Vishnupuri,*
**Nanded – 431 606 (M.S.)**

तारः " ज्ञानतीर्थ "

**स्वामी रामानंद तीर्थ**
**मराठवाडा विद्यापीठ**

*"ज्ञानतीर्थ", विष्णुपूरी,*
**नांदेड — ४३१ ६०६ (महाराष्ट्र)**

संदर्भ : परीक्षा/प.नि/२०१३—१४/१०५६ दिनांक : २४/०६/२०१४

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व सलग्नित महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ

विषय : शैक्षणिक वर्ष २०१४—१५ पासुन नविन परीक्षा पध्दती लागु करणे बाबत....

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, मा. विद्यापरीषदेच्या दिनांक ३० एप्रिल २०१४ रोजीच्या बैठकी मधील विषय क्र. २६/३२—२०१४ नुसार शैक्षणीक वर्ष २०१४ - २०१५ पासुन बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी. बी.बी.ए. या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी नवीन परीक्षा पध्दतीस मा.विद्यापरीषदेने मान्यता प्रदान केलेली आहे. सदरील बैठकीतील ठराव खालील प्रमाणे आहेत;

१) सध्या अस्तित्वात असलेली बहुपर्यायी परीक्षा पध्दती शैक्षणिक वर्ष २०१४—१५ पासुन प्रथम वर्षासाठी बंद करण्यात येत आहे.
२) नवीन परीक्षापध्दती हिवाळी २०१४ ( शैक्षणिक वर्ष २०१४—१५) पासून लागू करण्यात यावी.
३) सदर परीक्षेचा गुणाचा पॅटर्न ३०+१०+१० ( दिर्घोत्तरी स्वरुपाचे ३० गुण + एम.सी. क्यू. १० गुण + अंतर्गत १० गुण ) असा असेल.
४) उत्तीर्ण होण्यासाठी (३०+१० एकूण ४० गुणा पैकी १६ गुण तसे १०गुणापैकी ०४ गुण मिळणे आवश्यक राहिल)
५) एम.सी. क्यू. साठी निगेटीव्ह मार्कींग राहिल. एकूण चार चूकांसाठी ०१ गुण कमी करण्यात येईल.
६) पहिला अर्धातास एम. सी. क्यू. परीक्षेसाठी राखीव ठेवण्यात यावा व पुढील दोन तास दिर्घोत्तरी प्रश्नांसाठी राखीव ठेवण्यात यावे. परीक्षा सुरु झाल्यावर दहा मिनीटांनंतर परीक्षा दालनात प्रवेशीत झालेल्या विद्यार्थ्यांस एम. सी. क्यू उत्तर पत्रिका

....२

Telegram:"Dnyanteerth"

**Swami Ramanand Teerth**
**Marathwada University**

*"Dnyanteerth", Vishnupuri,*

**Nanded – 431 606 (M.S.)**

तारः " ज्ञानतीर्थ "

**स्वामी रामानंद तीर्थ**
**मराठवाडा विद्यापीठ**

*"ज्ञानतीर्थ", विष्णुपूरी,*

**नांदेड — ४३१ ६०६ (महाराष्ट्र)**



देण्यात येवू नये. त्यास फक्त दिर्घोत्तरी प्रश्नासाठी उत्तरपत्रिका देण्यात यावी. तसेच परीक्षा सुरु झाल्यानंतर तीस मिनटानंतर येणा—या विद्यार्थ्यांस परीक्षा दालनात प्रवेश देउ नयेत.

तसेच शैक्षणिक वर्ष २०१४—२०१५ पासून सर्व पदवी व पदव्युत्तर स्तरावर अभ्यासक्रमासाठी श्रेयांक CGPA व CBCS पध्दतीचा अवलंब करणे बाबत मा. अधिष्ठांताच्या संयुक्त बैठकीत ठराव मान्य झालेला आहे. या बाबत सविस्तर नियमावली शैक्षणीक विभागाकडुन सर्व महाविद्यालयास पुरविण्यात येईल तसेच या विषयी विद्यापीठामध्ये तंज्ञाच्या मार्गदर्शनाखाली लवकरच कार्यशाळा घेण्यात येणार आहे.

सबब, उपरोक्त प्रमाणे महाविद्यालय स्तरावर कार्यवाही करणे आपणास बंधनकारक आहे त्यामुळे कृपया ही बाब आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, विद्यार्थ्यांना निदर्शनास आणून द्यावी.

आपला

Sd/-

**परीक्षा नियंत्रक**

प्रत:

१) मा.कुलगुरु यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

२) मा.संचालक,म.वि.वि.म.य,प्रस्तुत विद्यापीठ

Phone/फोन नं: (02462) 229294 / 229145 / 229543 Fax No./ फॅक्स नं: (02462) 229520



Web site : srtmun.ac.in